लोकमत




**पर्पल फेस्तसारखे कार्यक्रम जरूर व्हावेत, आणखी जोमाने व्हावेत, परंतु ते झाल्यानंतर त्याचा लेखाजोखाही अत्यंत गंभीरपणे होऊन प्रत्यक्षात त्याचा लाभ दिव्यांग घटकाला होईल, याची दक्षता घेण्याची जबाबदारी सरकारी पैशांवर हे उपक्रम करणाऱ्या आयोजकांनी घ्यायला हवी.**

स्नेहयात्रा


प्रकाश वामन कामत

१५ ऑक्टोबर हा जागतिक शुभ्र काठी दिन. आपणही वार्षिक पद्धतीने 'नॅब' गोवा संस्थेतर्फे पणजीत प्रभात फेरी काढून हा दिवस साजरा केला. पण हे दिवस साजरे करायचे उपचार सोडून प्रत्यक्षात तो दिवस सोडल्यास राहिलेले ३६५ दिवस दृष्टीबाधित तसेच इतर दिव्यांगांसाठी समाज काही करतो का? हा प्रश्न मला नेहमीच अस्वस्थ करतो.

दिव्यांग दृष्टीबाधितांच्या सक्षमीकरणासाठी, स्वावलंबनासाठी, आर्थिक सबलीकरणासाठी हवी असते सार्वजनिक क्षेत्रातील 'आयसीटी प्रवेश सुलभता.' आभासी (व्हर्च्यूअल) जगातील इन्फर्मेशन, कम्युनिकेशन आणि टेक्नॉलॉजी यांची प्रवेश सुलभता. शिकलेले, नोकरी, रोजगार करू पाहणारे दृष्टीबाधित दिव्यांग या प्रवेश सुलभतेसाठी धडपडत असतात. ट्वीटरसारख्या समाज माध्यमावर विविध मोबाइल ॲप्स, टॅक्सी सेवा ॲप्स, ऑनलाइन सेवांचे ॲप्स, सरकारी, निमसरकारी, खासगी सेवा कंपन्यांच्या वेबसाईटस् या गोष्टी प्रवेश सुलभ नसतात, अशी तक्रार ते करतात. सरकारी हॉस्पिटलमध्ये टॉयलेट, लिफ्ट अशा सेवांमध्ये ब्रेलचा वापर करण्याची तसदी घेतली आत नाही. अनेक ठिकाणी जमिनीवर टॅक्टायल बसवलेले असतात, परंतु अनेक महाभागांना ते शोभेसाठी बसवले आहेत, असेच वाटते. ही आपली सार्वजनिक जीवनातील दृष्टीबाधित जनांविषयीची सहवेदना आणि सर्वसमावेशकतेची भावना, केंद्र सरकारच्या सबलीकरण व सामाजिक न्याय मंत्रालयाने तर कहरच केला आहे. दृष्टीबाधित दिव्यांगांच्या आयसीटी प्रवेश सुलभतेच्या तक्रारींसाठी असलेले 'सुगम्य भारत' हे ॲपच प्रवेश सुलभ नसल्याने त्याविषयी दृष्टीबाधित लोक समाज माध्यमे व इ-मेलद्वारे तक्रार नोंदवतात. परंतु त्याकडे कुणाचेच लक्ष जात नाही. कारण हा समाज घटक अत्यल्प आहे. त्यामुळे ते दुर्लक्षित, उपेक्षित राहिले तर कुणाचे काय विघडणार? त्यांचा आवाज क्षीण आहे. जोपर्यंत समाज त्यांचा आवाज बनत नाही, तोपर्यंत ही उपेक्षा सुरूच राहणार.

दिव्यांगांसाठी राखीव नोकऱ्या आहेत, त्यांच्यासाठी स्वयंरोजगाराच्या योजनाही घोषित होत असतात. 'स्कील डेव्हलपमेंट'च्या नावाने घोषणा केल्या जातात, परंतु त्यांच्यासाठी 'एनेबलिंग' आयसीटी प्रवेश सुलभता, इतर दिव्यांगांसाठी कामाच्या ठिकाणी 'रिझनेबल ॲकोमोडेशन' (वाजवी सुविधा) व्यवस्था नसेल तर ते अशा नोकऱ्या, व्यवसाय कसे करू शकतील?

गोव्यात गेल्यावर्षी दिव्यांगांसाठी समाज जागृतीचे 'पर्पल फेस्त' दिव्यांग हक्क आयुक्त व सरकारच्या पुढाकाराने पार पडले. जागृतीच्या दृष्टीने असे कार्यक्रम आवश्यक, यात संशय नाही. यंदा तर सरकारी आयुक्तांनी जागतिक पर्पल फेस्टीव्हलची घोषणा केली आहे. असे खर्चिक उपक्रम जरूर व्हावेत, परंतु त्यातून जागृती निर्माण करतानाच प्रत्यक्षात यजमान सरकारने आपण प्रवेश सुलभता या अत्यंत जिव्हाळ्याच्या समस्येवर किती गंभीरपणे काम करतो यावरही आत्मपरीक्षण करायला हवे. गोव्यातील किती सरकारी हॉस्पिटलमध्ये दिव्यांगांसाठी राखीव पार्किंग, प्रवेश सुलभ टॉयलेट्ससारख्या गरजेच्या सुविधा आहेत? केंद्र सरकारचे आयुर्वेद हॉस्पिटल हल्लीच मोठा गाजावाजा करून धारगळ येथे सुरू करण्यात आले. तिथे गेलेल्या दिव्यांगांना अनेक अडचणी आल्या, त्यांना दिव्यांग हक्क आयुक्तांकडे प्रवेश सुलभतेसंदर्भात अनेक तक्रारी कराव्या लागल्या, तेव्हा कुठे व्यवस्थापन जागे झाले.

गेल्या पर्पल फेस्टीव्हलमध्ये मुख्यमंत्र्यांनी गोवा राज्य प्रवेश सुलभ पर्यटन क्षेत्र होईल अशी घोषणा केली. अजून नव्या पंचायत इमारतीचे उद्घाटन खुद्द मंत्री करतात, परंतु त्या प्रवेश सुलभ आहेत का, हे पाहत नाहीत, गोव्यात अनेक मनोरंजनाचे कार्यक्रम, खेळ-शर्यती यांची जाहिरातबाजी होते, मंत्री, वरील सरकारी अधिकारी पाहुणे म्हणून हजर राहतात. सरकार त्यांना साहाय्य करते, हे उपक्रम 'इन्क्लुझिव्ह' का नाहीत, अशी आयोजकांची कानउघडणी एकाही मंत्री, अधिकाऱ्याने केल्याचे वाचले / ऐकले नाही. दरवेळी दिव्यांग व्यक्तींच्या आयुक्तांकडे तक्रारी जाणार, मग आयोजकांचे उपक्रम सर्वसमावेशक करण्यासाठी डोळ्यांना पाणी लावणे, हे किती दिवस चालणार? अशा कार्यक्रमांना मान्यता, अनुदान, सवलती देणारी सरकारी खाती याविषयी जागृत राहून का काम करत नाहीत? पर्पल फेस्टीव्हलसारख्या कार्यक्रमातून ही सर्वसमावेशकता, सहसंवेदना, गांभीर्य जर सरकारात येणार नसेल तर मग नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे, असाच त्याचा अर्थ पर्पल फेस्तसारखे कार्यक्रम जरूर व्हावेत, आणखी जोमाने व्हावेत, परंतु ते झाल्यानंतर त्याचा लेखाजोखाही अत्यंत गंभीरपणे होऊन प्रत्यक्षात लाभ दिव्यांग घटकाला होईल, याची दक्षता घेण्याची जबाबदारी सरकारी पैशांवर हे उपक्रम करणाऱ्या आयोजकांनी घ्यायला हवी.

आमच्या मुलांच्या नोकरीचे काय? हे बौद्धिक दिव्यांगांच्या पालकांचे प्रश्न, आमच्यानंतर आमच्या मुलांचे काय? हे मानसिक दिव्यांग मुले, वयस्क यांच्या पालकांचे प्रश्न अनुत्तरीत आहेत.

पर्पल फेस्टीव्हल हे साध्य नव्हे, साधन होय!



Goa Main
Page No. 12 Oct 29, 2023
Powered by: erelego.com